महावितरण
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/क्रीडा/No 14607 दिनांक : 15 JUN 2017

# परिपत्रक

**विषय:** महावितरण कंपनीच्या संघामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडू / कलाकार इ. कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी दौऱ्यावर असताना द्यावयाच्या दैनिक पुरक भत्त्याच्या दराबाबत.

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र. १३० दि. ०२.११.२००७.

************

संदर्भीय प्रशासकीय परिपत्रकान्वये खेळाडू / कलाकार इ. कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी दौऱ्यावर असताना रु. १३०/- प्रतिदिन या दराने दैनिक पूरक भत्ता देण्याबाबतच्या सुचना प्रसारित करण्यात आल्या होत्या.

मात्र, महावितरण कंपनीचा संपूर्ण क्रीडा संघ ज्या - ज्या वेळेस विविध स्तरावरील मान्यताप्राप्त जिल्हा / राज्य / आंतरराज्य आणि अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या विविध स्तरावरील क्रीडास्पर्धा तसेच महावितरण कंपनीचा नाट्य संघ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित राज्य नाट्य स्पर्धा यामध्ये सहभागी होईल अशा वेळी महावितरण कंपनीच्या संघामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडू / कलाकार कर्मचाऱ्यांना देखील संदर्भीय परिपत्रकात नमूद केल्यानुसार रु. १३०/- प्रतिदिन या दराने दैनिक पूरक भत्ता अदा करण्यात येत होता. सदर दैनिक पूरक भत्त्याच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता.

याबाबत सर्वकष विचारांती अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) / (वित्त) / (प्रकल्प) व कार्यकारी संचालक (मासं) यांचेशी विचारविनिमय करुन **महावितरण कंपनीच्या क्रीडा व नाट्य संघातील सहभागी खेळाडू / कलाकार व इतर संबंधीत कर्मचारी यांना विविध स्तरावरील मान्यताप्राप्त जिल्हा / राज्य / आंतरराज्य आणि अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या विविध स्तरावरील क्रीडास्पर्धा तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित राज्य नाट्य स्पर्धा यामध्ये सहभागी झाल्यानंतर दौऱ्यावर असताना रु. ५००/- (रु. पाचशे मात्र) प्रतिदिन अशा वाढीव दराने दैनिक पूरक भत्ता** देण्यासाठी मंजूरी दिलेली आहे.

दैनिक पूरक भत्त्याचे वाढीव दर सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP -Infoportal मध्ये Circular (I.R. Department ) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(सचिन ढोले)
कार्यकारी संचालक (मासं)
महावितरण

C:\Users\Admin\Desktop\Archana Typ ON\GANVESH.DOC